Agrowon, 31/07/2025



नातेपुते, जि. सोलापूर : केळीचे वजन, प्रतवारी करताना कामगार.

# माळशिरसमधून दररोज १० टन केळीची निर्यात

## सौदी अरेबिया, दुबई, इराण, इराक, ओमान देशांतून मोठी मागणी

सुनील राऊत : ॲग्रोवन वृत्तसेवा

नातेपुते, जि. सोलापूर : उसाचा पट्टा म्हणून ओळख असलेल्या माळशिरस तालुक्यात अलीकडच्या काही वर्षांत केळीचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढत असून, सध्या हा संपूर्ण पट्टा केळी उत्पादनाचा आगर म्हणून ओळख मिळवत आहे. स्थानिक बाजारपेठेसह सध्या माळशिरस तालुक्यातून दररोज दहा टनांपर्यंत केळीची निर्यात होत आहे.

सध्या शेती करणे म्हणजे आतबट्ट्याचा व्यवसाय समजला जातो. भुसार पिके मजुरांअभावी कोणी करताना दिसत नाही. बहुतेक बागायतदार हे घरी शेती असूनसुद्धा दररोज खाण्यासाठी गहू, ज्वारी, बाजरी बाजारपेठेतून खरेदी करत आहेत, याला कारण म्हणजे, वाढती मजुरी. उत्पादन खर्चही निघत नाही, याला पर्याय म्हणून या भागात ऊस उत्पादन सुरू झाले. परंतु एकरी उत्पादन कमी निघत असल्यामुळे नगदी पीक ही उसाची ओळखही पुसून गेली. त्यानंतर डाळिंब पिकात अनेकांनी लाखो रुपये कमावले; परंतु बदलत्या हवामानामुळे डाळिंब फळावर तेल्या रोगाने आणि मर रोगानेही संकट आणले. त्यानंतर अलीकडच्या काळात आधुनिक पद्धतीने केळी लागवडीकडे शेतकरी वळले आहेत. जी-९ ही केळी या भागात दर्जेदार पिकू लागली आहे. ते आता चांगले उत्पादन आणि उत्पन्न मिळवू लागले आहेत. सध्या सोलापूर जिल्हा केळी उत्पादनात आघाडी मिळवत आहे. त्यातही माळशिरस, पंढरपूर, माढा आणि करमाळा तालुक्यात केळीचे क्षेत्र वाढते आहे. सध्या

> शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त केळी आधुनिक पद्धतीने करावी. आपल्या उत्पन्नात भर टाकावी. दर्जेदार उत्पादित मालाला परदेशात चांगला दर मिळत आहे.
>
> **- वाजिद अली महम्मद बागवान,** व्यापारी, नातेपुते

> शेतकऱ्यांना शासनाने कृषी विभागाकडून दर्जेदार खतांबरोबरच केळीचे उच्च प्रतीची रोपे मिळवून द्यावीत. तसेच कोल्ड स्टोअरेज उभारणे गरजेचे आहे.
>
> **- शाहीद बागवान,** नातेपुते

माळशिरस तालुक्यातील केळी सौदी अरेबिया, दुबई, इराण, इराक, ओमान आदी देशांत निर्यात होत आहे. तसेच कमी प्रतीचा माल बांगलादेश, नेपाळ, उत्तर भारतात जात आहे.

### सोलापूरच्या केळीची गुणवत्ता

खानदेश, जळगाव, रावेर, वसमत, नांदेड, मुक्ताईनगर येथील केळीपेक्षा सोलापूर जिल्ह्यातील केळी उच्च प्रतीची व दर्जेदार उत्पादित होत असल्याने निर्यातदार कंपन्या सोलापूर जिल्ह्यातील केळीला पसंती देत आहेत. जळगाव भागापेक्षा या भागातील केळीला दोन ते चार रुपये जादा दर मिळत आहेत. नवरात्रीत नवीन केळीची आवक मोठ्या प्रमाणात होणार आहे. तोपर्यंत यापेक्षाही अधिक दर वाढण्याची शक्यता आहे, असे सांगण्यात आले.

Agrowon, 31/07/2025

# राष्ट्रीय बाजारतळ उभारणीसाठी अधिनियमात सुधारणा

अॅग्रोवन वृत्तसेवा

मुंबई : राज्यातील शेतकऱ्यांना शेतीमालाला रास्त व वाजवी भाव मिळावा यासाठी 'ई-नाम' योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आणि राष्ट्रीय नामांकित बाजारतळ स्थापन करणे सुलभ व्हावे यासाठी महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मध्ये सुधारणा करण्यास मंगळवारी (ता. २९) मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

कृषी उत्पन्न बाजार समितीतील कृषी उत्पन्नाच्या व्यापारामधील अडसर कमी व्हावेत यासाठी केंद्र व राज्य शासन राज्यातील १३३ कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये ई-नाम योजना राबवीत आहे. कृषी उत्पन्नाच्या व्यापारासाठी ऑनलाइन पद्धती कार्यान्वित करीत आहे. पण अजूनही राज्यात ई-नामअंतर्गत 'सिंगल युनिफाइड लायसन्स'ची तरतूद नसल्याने, इंटरमंडी व इंटर स्टेट ट्रेड सुरू होऊ शकलेले नाहीत. दरम्यान, केंद्र शासनाच्या कृषी व शेतकरी कल्याण विभागाने कृषी उत्पन्न आणि पशुधन पणन (प्रचालन व सुविधा) अधिनियम, २०१७ (मॉडिल अॅक्ट) प्रकाशित केला आहे. या अनुषंगाने राज्याच्या महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मध्ये सुधारणांसाठी २०१८ च्या हिवाळी अधिवेशनात विधेयक मांडण्यात आले. यातील तरतुदींबाबत सुधारणांसाठी मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यात आली होती. या उपसमितीने सुधारणांची शिफारस केली आहे. त्यानुसार केंद्राच्या मॉडिल अॅक्टमधील तरतुदीनुसार राज्यातील ज्या मोठ्या बाजार समित्यांकडे अन्य किमान २ राज्यांतून शेतीमाल येतो, अशा बाजार समित्यांना राष्ट्रीय नामांकित बाजार समित्या घोषित करण्याची तरतूद करण्यात येणार आहे.

अशा बाजार समित्या राष्ट्रीय नामांकित बाजार समित्या घोषित केल्यानंतर या समित्यांवर शासनाचे थेट नियंत्रण होऊन निर्णय प्रक्रिया व पणन प्रक्रिया सुलभतेने व वेगाने होणार आहे.

## सचिव केडर स्थापण्याची होणार सुधारणा

कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या सचिवांचे केडर तयार करण्याची शिफारस करण्यात आली आहे. जेणेकरून सचिव हा या कार्यालयाच्या थेट नियंत्रणाखाली येऊन शासन व बाजार समिती यामधील दुवा म्हणून तो काम करेल, तसेच कृषी उत्पन्न बाजार समित्यांवरदेखील प्रभावी नियंत्रण ठेवता येईल. यासाठी सचिवाला पर्यवेक्षणाबाबतचे कामकाज सोपविले जाणार आहे. या सचिवांचे पगार देखरेख शुल्कामधून जमा होणाऱ्या रकमेमधून करण्यात येणार आहेत. याकरिता कृषी उत्पन्न बाजार समित्यांकडून आकारण्यात येणारी देखरेख शुल्काची रक्कम शासनाऐवजी पणन विभागाला सुपूर्द करावी, अशी सुधारणाही अधिनियमात करण्यात येणार आहे. या अधिनियमातील सुधारणांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी स्थानिक स्तरावर सनियंत्रण समिती स्थापन करण्यासही मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

Samna, 30/07/2025

# पणन सुधारणा विधेयकास राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी

पुणे, दि. २९ (प्रतिनिधी) - राज्यातील शेतकऱ्यांच्या शेतमालाला रास्त व वाजवी भाव मिळावा यासाठी 'ई-नाम' योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे. त्याअंतर्गत राष्ट्रीय नामांकित बाजारतळ स्थापन करणे सुलभ व्हावे यासाठी महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम-१९६३मध्ये सुधारणा करण्यास मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. पहिल्या टप्प्यात मुंबई, पुणे, लातूर, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, नागपूर या बाजार समित्यांना राष्ट्रीय दर्जा मिळणार असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली.

राज्यातील ८० हजार मेट्रिक टन कृषी माल विक्री उलाढाल होते, तसेच दोनपेक्षा अधिक राज्यातील कृषी माल विक्रीस येतो. अशा कृषी उत्पन्न बाजार समितीचा समावेश 'राष्ट्रीय नामांकित बाजारतळ' म्हणून होणार आहे. कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे सनियंत्रण व कार्यपद्धती अधिक प्रभावी करण्यासाठी महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम-१९६३मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. राज्यपालांच्या सहीनंतर याबाबतचा अध्यादेश निघणार आहे.

सकाळ

# बाजार समित्यांच्या ‘राष्ट्रीय दर्जा’वर शिक्कामोर्तब

## पणन सुधारणा विधेयकास मान्यता : मुंबई, पुणे, कोल्हापूरसह सात ठिकाणांचा समावेश

**मार्केट यार्ड, ता. २९ : राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या कार्यपद्धतीत आमूलाग्र सुधारणा करण्याच्या दृष्टीने राज्य मंत्रिमंडळाने महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मध्ये सुधारणा करण्यास मान्यता दिली आहे. त्यामुळे आता राज्यातील प्रमुख बाजार समित्यांना राष्ट्रीय दर्जा मिळणार असून, ‘ई-नाम’ योजनेची प्रभावी अंमलबजावणी होणार आहे. पहिल्या टप्प्यात राज्यातील मुंबई, पुणे, लातूर, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, नागपूर या सात प्रमुख बाजार समित्यांना राष्ट्रीय बाजाराचा दर्जा दिला जाणार असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली.**

राज्यातील बाजार समित्या राष्ट्रीयकरणाच्या कक्षेत येणार असल्याची बातमी ‘सकाळ’ने काही दिवसांपूर्वी प्रसिद्ध केली होती. मंगळवारी (ता. २९) मंत्रिमंडळाने पणन सुधारणा विधेयकास मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे राष्ट्रीय नामांकित बाजारतळ स्थापन होतील, ज्याचा थेट फायदा राज्यातील लाखो शेतकऱ्यांना होणार आहे. केंद्र शासनाच्या नवीन कायद्यानुसार सुचवण्यात आलेल्या सुधारणा स्वीकारून पणन सुधारणा विधेयक मंत्रिमंडळात सादर करण्यात आले होते. त्यानुसार मंजुरी देण्यात आली असून, राज्यपालांच्या सहीनंतर याबाबतचा अध्यादेश निघणार आहे.

### सुधारणा विधेयकाची प्रमुख वैशिष्ट्ये

- विविध प्रकारचे बाजारतळ स्थापन करण्याची तरतूद
- वखार, सायलो, शीतगृह यांना बाजार उपतळाचा दर्जा
- ई-नाम आणि ई-व्यापाराची सशक्त अंमलबजावणी
- पशुधन व्यापाराचे नियमन
- राष्ट्रीय नामांकित बाजारतळ आणि संबंधित व्यवस्था
- कृषी मालाचे सॉर्टिंग, ग्रेडिंग व पॅकिंग करण्यासाठी आधुनिक सुविधा
- जलद पुरवठा साखळीसाठी रोड, पोर्ट, विमानतळाची कनेक्टिव्हिटी
- आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पणन सुविधा निर्माण होणार

“ शेतीमालाला स्पर्धात्मक दर मिळण्यासाठी राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर बाजारपेठ उपलब्ध करून चांगला बाजारभाव मिळवून देणे हे राज्य सरकारचे धोरण आहे. राज्यात राष्ट्रीय नामांकित बाजारतळ स्थापन करण्याचा निर्णय राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. यामुळे बाजार समित्यांवर शासनाचे थेट नियंत्रण येऊन निर्णय प्रक्रिया व पणन प्रक्रिया सुलभतेने आणि वेगाने होणार आहे.

**- जयकुमार रावल**, पणनमंत्री

### सभापतिपद ‘औट घटकेचे’

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सुरू असलेल्या उच्चस्तरीय चौकशीच्या पार्श्वभूमीवर सभापती दिलीप काळभोर यांनी नुकताच राजीनामा दिला. १८ जुलैला नव्या सभापतींची निवड झाली होती; मात्र राष्ट्रीय बाजाराच्या हालचालींमुळे हे पद केवळ काही महिन्यांपुरते मर्यादित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

### सचिवांचे केडर तयार होणार

कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या सचिवांचे केडर तयार करण्याची शिफारसही करण्यात आली आहे. जेणेकरून सचिव हा या कार्यालयाच्या थेट नियंत्रणाखाली येऊन शासन व बाजार समिती यामधील दुवा म्हणून काम करेल, तसेच कृषी उत्पन्न बाजार समित्यांवरदेखील नियंत्रण ठेवता येईल. यासाठी सचिवांना पर्यवेक्षणाबाबतचे कामकाज सोपविले जाणार आहे. सचिवांचे पगार देखरेख शुल्कामधून जमा होणाऱ्या रकमेतून करण्यात येणार आहेत.

### राष्ट्रीय बाजाराचे निकष

जेथे ८० हजार मेट्रिक टन कृषिमाल विक्रीची उलाढाल होते, तसेच दोनपेक्षा अधिक राज्यांतील कृषिमाल विक्रीस येतो, अशा कृषी उत्पन्न बाजार समित्यांचा समावेश ‘राष्ट्रीय नामांकित बाजारतळ’ म्हणून होणार आहे.



# पणन सुधारणा विधेयकास राज्यमंत्रिमंडळाची मान्यता

**। पुणे : प्रतिनिधी**

राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या कार्यपद्धतीत आमूलाग्र सुधारणा करण्याच्या हेतूने राज्य मंत्रिमंडळाने महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मध्ये सुधारणा करण्यास मान्यता दिली आहे. त्यामुळे आता राज्यातील प्रमुख बाजार समित्यांना राष्ट्रीय दर्जा मिळणार असून, ई-नाम योजनेची प्रभावी अंमलबजावणी होणार आहे. पहिल्या टप्प्यात मुंबई, पुणे, सोलापूर आणि नागपूर या चार प्रमुख बाजार समित्यांना राष्ट्रीय बाजाराचा दर्जा दिला जाणार असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे.

याबाबतचे वृत्त काही दिवसांपूर्वी दैनिक पुण्यनगरीने राज्यातील बाजार




समित्यांना राष्ट्रीय दर्जा मिळणार या मथळ्याखाली प्रसिद्ध केले होते. याबाबत मंगळवारी (दि. २९) मंत्रिमंडळाने पणन सुधारणा विधेयकास मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे राष्ट्रीय नामांकित बाजारतळ स्थापन होतील, ज्याचा थेट फायदा राज्यातील शेतकऱ्यांना होणार आहे. केंद्र शासनाच्या नवीन मॉडेल अॅक्टनुसार सुचवण्यात आलेल्या सुधारणा स्वीकारून पणन सुधारणा विधेयक क्रमांक ६४ मंत्रिमंडळात सादर करण्यात आले होते. त्यानुसार मंजुरी देण्यात आली असून, राज्यपालांच्या सहीनंतर याबाबतचा अध्यादेश निघणार आहे. तसेच येणाऱ्या अधिवेशनात हे विधेयक मांडले जाणार आहे.

अधिवेशना वेळी विधानभवनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत मंत्री जयकुमार रावल, प्रधान सचिव आणि राज्याचे पणन संचालक विकास रसाळ यांच्या उपस्थितीत यावर चर्चा झाली होती. या वेळी रावल यांनी स्पष्ट केले होते की, शेतकऱ्यांच्या हितासाठी आणि केंद्राच्या योजनांचा लाभ मिळवण्यासाठी हे बदल अत्यंत आवश्यक आहेत. याच पार्श्वभूमीवर प्रशासकीय मंडळांची नियुक्ती, ई-व्यापार व डिजिटल बाजार, तसेच विशेष शेतीमाल बाजार समित्या अशा विविध सुधारणा होणार आहेत.

### दैनिक पुण्यनगरीने बाजार समितीचा गैरव्यवहार केला उघड

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये संचालक मंडळाने गेल्या दोन वर्षांत केलेल्या गैरव्यवहाराबाबत सातत्याने दैनिक पुण्यनगरीने आवाज उठवला होता याची दखल विधिमंडळात देखील घेतली गेली, त्यामुळेच उच्चस्तरीय चौकशी स्थापन झाली. त्यानंतर आता राष्ट्रीय बाजार झाल्यास संचालक मंडळाचे अस्तित्व आपोआपच संपणार आहे. याबाबत बाजार घटकांकडून दैनिक पुण्यनगरीवर कौतुकाचा वर्षाव केला जात आहे.

### सुधारणा विधेयकाची प्रमुख वैशिष्ट्ये

- विविध प्रकारचे बाजार स्थापन करण्याची तरतूद
- वखार, सायलो, शीतगृह यांना बाजार उपतळाचा दर्जा
- ई-नाम आणि ई-व्यापाराची सशक्त अंमलबजावणी
- पशुधन व्यापाराचे नियमन
- राष्ट्रीय नामांकित बाजारतळ आणि संबंधित व्यवस्था

### पुणे बाजार समितीचे सभापतिपद औट घटकेचे

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सुरू असलेल्या उच्चस्तरीय चौकशीच्या पार्श्वभूमीवर नुकतेच सभापती दिलीप काळभोर यांनी राजीनामा दिला. १८ जुलैला नव्या सभापतीची निवड झाली होती. मात्र, राष्ट्रीय बाजाराच्या हालचालींमुळे हे पद केवळ काही महिन्यांपुरते मर्यादित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे हे पद औट घटकेचे ठरण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### म्हणून पुणे बाजार समिती राष्ट्रीय बाजार...

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळावर गैरप्रकार केल्याचे गंभीर आरोप आहेत याबाबत पणनमंत्री जयकुमार रावल यांनी आमदार सदाभाऊ खोत यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधीला उत्तर देताना उच्चस्तरीय चौकशी समितीची घोषणा केली होती. तसेच राज्याच्या पणन संचालकांनीही ५१ मुद्द्यांच्या आधारे चौकशी समिती नेमली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, पणनमंत्री जयकुमार रावल यांच्यासह पणसंचालकांकडे अनेक तक्रारी दाखल आहेत. त्यामुळे समिती बरखास्त करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. मात्र, बाजार समितीवर सर्वपक्षीय संचालक मंडळ असल्याने बरखास्त केल्यास नामुष्की ओढवू शकते. त्यामुळे बरखास्त न करता राष्ट्रीय बाजार झाल्यास आपोआपच संचालक मंडळ बरखास्त होईल, त्याच अनुषंगाने पुणे बाजार समितीचा समावेश करण्यात येणार आहे.

# बाजार समिती कायदा सुधारणांमुळे राष्ट्रीय कृषी बाजारावर शिक्कामोर्तब

पुढारी वॉच

## कायदा मंजुरीला राज्यपालांची मंजुरी अपेक्षित

**पुणे : महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन कायद्यातील सुधारणांना मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये मंगळवारी (दि. २९) मान्यता दिल्यामुळे राष्ट्रीय कृषी बाजार निर्माण करण्यावर शिक्कामोर्तब झाले आहे. बाजार समिती कायदा बदलाचा मसुदा राज्यपालांच्या सहीने लवकरच मंजूर होण्याची अपेक्षा आहे. त्यानंतर राज्यातील त्या पाच कृषी उत्पन्न बाजार समित्यांचा समावेश राष्ट्रीय कृषी बाजारात होण्याचा मार्गही मोकळा होईल, अशी माहिती पणन विभागातून मिळाली.**

'राष्ट्रीय कृषी बाजारात पाच बाजार समित्यांचा समावेश अपेक्षित' असे वृत्त दै. 'पुढारी'ने मंगळवारी (दि.२८) प्रसिद्ध केले होते. ते खरे ठरले आहे. त्यामध्ये मुंबई, पुणे, नागपूर, सोलापूर, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचा समावेश असल्याचे सांगण्यात आले.

मंत्रिमंडळातील बाजार समिती कायदा सुधारणांमुळे राष्ट्रीय बाजार होणार हे स्पष्टच झालेले आहे. त्यामुळे संबंधित पाच बाजार समित्यांचा समावेश होऊन तेथील संचालक मंडळे आपोआप तत्काळ बरखास्त होतील, अशी माहिती सूत्रांकडून देण्यात आली.

पणन विभागाने कृषी उत्पन्न बाजार समिती कायद्यात सुधारणा करण्याचा प्रस्ताव यापूर्वीच दिला होता. त्यानुसार निर्णय झाल्यामुळे आता कायदा सुधारणांचा मसुदा राज्यपालांनी सही केल्यानंतर तसा अध्यादेश निघण्याची अपेक्षा आहे. त्यानुसार तत्काळ अंमलबजावणी होऊन ३०६ बाजार समित्यांपैकी कायदा सुधारणांमधील संभाव्य अटी व निकषांनुसार त्या बाजार समित्यांमध्ये तत्काळ अंमलबजावणी होण्याची आशा आता बळावल्याचे सांगण्यात आले.


पुढारी वॉच

राष्ट्रीय कृषी बाजारात पाच बाजार समित्यांचा समावेश अपेक्षित

मुंबई, पुणे, नागपूर, सोलापूर, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचा समावेश शक्य

Lokmat, 30/07/2025

# बाजार समित्यांना राष्ट्रीय दर्जा मिळणार; लवकरच अध्यादेश निघणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये आमूलाग्र सुधारणा करण्याच्या दृष्टीने राज्य मंत्रिमंडळाने महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मध्ये सुधारणा करण्यास मंगळवारी मान्यता दिली आहे. त्यामुळे आता राज्यातील प्रमुख बाजार समित्यांना राष्ट्रीय दर्जा मिळणार असून, 'ई-नाम' योजनेची प्रभावी अंमलबजावणी होणार आहे. पहिल्या टप्प्यात मुंबई, पुणे, सोलापूर आणि नागपूर या चार प्रमुख बाजार समित्यांना राष्ट्रीय बाजाराचा दर्जा दिला जाणार असल्याची माहिती आहे.

या निर्णयामुळे राष्ट्रीय नामांकित बाजारतळ स्थापन होतील. केंद्र शासनाच्या नवीन मॉडेल ॲक्टनुसार सुचविण्यात आलेल्या सुधारणा स्वीकारून पणन सुधारणा विधेयक क्रमांक ६४ मंत्रिमंडळात सादर केले होते. त्यानुसार मंजुरी दिली असून राज्यपालांच्या सहीनंतर याबाबतचा अध्यादेश निघणार आहे. तसेच येणाऱ्या अधिवेशनात हे बिधेयक मांडले जाईल. अधिवेशनावेळी विधानभवनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत यावर चर्चा झाली होती.

> राज्यपालांच्या सहीनंतर याबाबतचा अध्यादेश निघणार आहे. तसेच येणाऱ्या अधिवेशनात हे विधेयक मांडले जाईल.

## डिजिटल बाजार, तसेच इतर सुधारणा होणार

जयकुमार रावल यांनी स्पष्ट केलं होतं की, शेतकऱ्यांच्या हितासाठी आणि केंद्राच्या योजनांचा लाभ मिळवण्यासाठी हे बदल अत्यंत आवश्यक आहेत. याच पार्श्वभूमीवर प्रशासकीय मंडळांची नियुक्ती, ई-व्यापार व डिजिटल बाजार, तसेच विशेष शेतीमाल बाजार समित्या अशा विविध सुधारणा होणार आहेत. याचा फायदा राज्यातील शेतकऱ्यांना होणार आहे. त्यामुळे हे विधेयक येणाऱ्या अधिवेशनात मंजूर होण्याची दाट शक्यता आहे.

## संचालकांवर टांगती तलवा

उच्चस्तरीय चौकशीच्या पार्श्वभूमीवर सभापती दिलीप काळभोर यांनी राजीनामा दिला. (दि.१८) जुलैला नव्या सभापतीची निवड झाली होती. मात्र, राष्ट्रीय बाजाराच्या हालचालींमुळे हे पद काही महिन्यापुरते मर्यादित राहील. सोमवारी उपसभापतीने राजीनामा दिल्याने नवा उपसभापती निवडीसाठी इतर संचालकांची मोर्चेबांधणी सुरू असताना मंगळवारी (दि.२८) जुलैला बाजार समित्यांना राष्ट्रीय दर्जा मंजुरी दिली असून अध्यादेश निघणार आहे, असा निर्णय झाल्याने सर्व संचालक मंडळावर टांगती तलवार आहे.

Kesari, 30/07/2025

# 'ई-नाम' योजनेची होणार प्रभावी अंमलबजावणी

**मुंबई** : राज्यातील शेतकऱ्यांना शेतमालाला रास्त आणि वाजवी भाव मिळावा, यासाठी 'ई-नाम' योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे. त्याअंतर्गत राष्ट्रीय नामांकित बाजारतळ स्थापन करणे सुलभ व्हावे, यासाठी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मध्ये सुधारणा करण्यास मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. कृषी उत्पन्न बाजार समित्यांकडून आकारण्यात येणारी देखरेख शुल्काची रक्कम सरकारऐवजी पणन विभागाला सुपूर्द करावी, अशी सुधारणाही अधिनियमात करण्यात येणार आहे. या अधिनियमातील सुधारणांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी स्थानिक स्तरावर संनियंत्रण समिती स्थापन करण्यासही मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

केंद्र आणि राज्य सरकार, कृषी उत्पन्न बाजार समितीतील कृषी उत्पन्नाच्या व्यापारामधील अडसर कमी व्हावे यासाठी राज्यातील १३३ कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये ई-नाम योजना राबवीत आहे. कृषी उत्पन्नाच्या व्यापारासाठी ऑनलाइन पद्धती कार्यान्वित करीत आहे. पण, अजूनही राज्यात ई-नाम अंतर्गत सिंगल युनिफाइड लायसन्सची तरतूद नसल्याने, इंटरमंडी आणि इंटर स्टेट ट्रेड सुरु होऊ शकलेले नाहीत. दरम्यान, केंद्र सरकारच्या कृषी आणि शेतकरी कल्याण विभागाने कृषी उत्पन्न आणि पशुधन पणन (प्रचालन व सुविधा) अधिनियम, २०१७ (मॉडेल ॲक्ट) प्रकाशित केला आहे. या अनुषंगाने राज्याच्या महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मध्ये सुधारणा करण्यासाठी २०१८ च्या हिवाळी अधिवेशनात विधेयक मांडण्यात आले होते. विधेयकातील तरतुदींबाबत सुधारणांसाठी मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यात आली होती. या उपसमितीने सुधारणांची शिफारस केली आहे. त्यानुसार केंद्राच्या मॉडेल ॲक्ट मधील तरतुदीनुसार राज्यातील ज्या मोठ्या बाजार समित्यांकडे अन्य किमान २ राज्यांतून शेतमाल येतो, अशा बाजार समित्यांना राष्ट्रीय नामांकित बाजार समित्या घोषित करण्याची तरतूद करण्यात येणार आहे. अशा बाजार समित्या राष्ट्रीय नामांकित बाजार समित्या घोषित केल्यानंतर या बाजार समित्यांवर राज्य सरकारचे थेट नियंत्रण होऊन निर्णय प्रक्रिया, पणन प्रक्रिया सुलभतेने आणि वेगाने होणार आहे. याशिवाय केंद्र सरकारच्या सदर मॉडेल ॲक्ट २०१७ नुसार सिंगल युनिफाइड लायसन्स संदर्भातील तरतुदींचा समावेश करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

पुढारी



पणन मंडळात पाशा पटेल यांच्या अध्यक्षतेखाली कांदा धोरण समितीच्या बैठकीवेळी उपस्थित मान्यवर.

# कांदा आयात-निर्यात धोरणासह साठवणुकीवर उपाययोजना

- राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांची माहिती
- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना शिफारशी करणार

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्य सरकारने कांदा दरात स्थिरता राहावी, यासाठी उत्पादक शेतकरी, खाणारा ग्राहक आणि विक्री करणारा विक्रेताही रडू नये, अशा पद्धतीचे सरकारचे धोरण असले पाहिजे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्नही वाढले पाहिजे, अशी भूमिका आहे. त्यादृष्टिने केंद्राचे कांदा आयात- निर्यातीच्या धोरणावर राज्याची भूमिका ठरविणे, कांदा उत्पादन, विक्री, साठवणूक व निर्यातीची अचूक माहिती ठेवणे आणि कांदा चाळ साठवणुकीच्या उपाययोजनेस प्राधान्य देण्यात येणार असल्याची माहिती राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष आणि राज्य सरकारच्या कांदा पीक धोरण समितीचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी दिली.

सोमवारी (दि.२८) कांदा समिती सदस्यांची महत्त्वपूर्ण बैठक मार्केट यार्डातील राज्य कृषी पणन मंडळाच्या कार्यालयात दुपारी तीन तास झाली. या बैठकीला पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, देशांतर्गत व्यापार प्रमुख सुहास काळे व अधिकारी, कृषी आयुक्तालयातील मुख्य सांख्यिक वैभव तांबे, पणन उपसंचालक मोहन निंबाळकर, कांदा निर्यातदार दानिश शहा व अन्य सदस्य उपस्थित होते. त्यानंतर पाशा पटेल यांनी बैठकीत ठरलेल्या दिशांबाबतची माहिती सायंकाळी पत्रकारांना दिली.

पटेल म्हणाले, राज्यात यंदा पाऊसपाणी चांगला असून ऑक्टोबर महिन्यात येणारे कांद्याचे नवीन पीक मुबलक हाती येणार असून कांद्याचे दर पडतील म्हणून बाजारातील वातावरण हवालदिल आहे. त्यासाठी दोन महिन्यानंतर कांद्यासंदर्भात शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून शासनास समितीकडून योग्य ते निवेदन देण्यात येणार आहे. त्यासाठी मंगळवारी (दि.२९) समितीकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पणनमंत्री जयकुमार रावल यांची भेट घेऊन माहिती देणार आहेत. तसेच, समितीच्या बैठका पूर्ण झाल्यानंतर समितीच्या शिफारशी शासनास करणार असल्याचे ते म्हणाले.

## समितीच्या बैठका होणार

कांद्याचे उत्पादन खर्च हा राजगुरुनगरमधील कांदा, लसूण संशोधन केंद्र आणि राहुरीतील महात्मा फुले कृषी विद्यापीठामध्ये काढला जातो. त्यादृष्टिने या दोन्ही ठिकाणी आम्ही समितीची बैठक घेऊन तेथील शास्त्रज्ञ व शेतकऱ्यांबरोबर घेणार आहोत. त्यामुळे योग्य उत्पादन खर्च काढला जावा यावर चर्चा होईल. तसेच आम्ही सोलापूर आणि लासलगावला शेतकऱ्यांची बैठक घेत असून कांदा निर्यातदारांची आणि अडते-व्यापाऱ्यांचीही बैठक घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## कांदा बैठकीतील विविध विषयांवर चर्चा व निर्णय

- कांदा लागवड क्षेत्र, उत्पादकता माहितीत अचूकता आणणार
- कांद्याची साठवणूक क्षमता वाढली तर बरेच प्रश्न सुटू शकतात.
- बटाटा बाजारभावातील स्थिरता कांद्यामध्ये आणण्यास प्राधान्य देणार
- नाफेडमार्फत होणारी कांदा खरेदी फायदेशीर होण्यावरही विचार करणार
- कांदा लागवडीसह काढणीपश्चात नुकसानीवरही समिती लक्ष देणार
- निर्यात वाढीसाठी संपूर्ण जगाच्या कांदा बाजारपेठेचा अभ्यास करणार

पुढारी

पुढारी वॉच

किशोर बरकाले
पुढारी प्रतिनिधी

# राष्ट्रीय कृषी बाजारात पाच बाजार समित्यांचा समावेश अपेक्षित

## मुंबई, पुणे, नागपूर, सोलापूर, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचा समावेश शक्य

**पुणे : राज्यातील पाच कृषी उत्पन्न बाजार समित्यांना राष्ट्रीय कृषी बाजाराचा दर्जा देण्यावर मंत्रालयस्तरावरून लवकरच शिक्कामोर्तब करण्याच्या हालचाली अंतिम टप्प्यात असल्याचे सांगण्यात आले. त्यामध्ये मुंबई, पुणे, नागपूर, सोलापूर आणि लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचा समावेश आहे. त्यामुळे या बाजार समित्यांवरील राजकीय वर्चस्वासाठी पक्षीय पातळीवरून होणारी चढाओढ आपोआप संपुष्टात येणार असून, पणनमंत्रीच या बाजार समित्यांचे पदसिद्ध अध्यक्ष राहणार असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले.**

केंद्र व राज्य सरकारकडून शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या विक्रीसाठी कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे बळकटीकरण करण्यावर भर देण्यात येत आहे. त्यासाठी पणन कायद्यात वेळोवेळी सुधारणाही करण्यात आल्या आहेत. राष्ट्रीय बाजार घोषित झाल्यावर ऑनलाइनद्वारे बाजार व्यवहाराची प्रभावी अंमलबजावणी करणे, बाजार आवाराच्या गेटवर शेतमालाची आवक-जावक नोंद घेणे, पायाभूत सुविधांमध्ये वाढ करून शेतकऱ्यांना अधिकाधिक सेवासुविधांवर भर देणे, पारदर्शक व्यवहारवाढीस प्रोत्साहन देऊन शेतकऱ्यांच्या मालास अधिकाधिक बाजारभाव मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे मंत्रालयातील सूत्रांनी सांगितले.

**लवकरच मंत्रिमंडळ बैठकीत शिक्कामोर्तब होणार; पणनमंत्री राहणार पदसिद्ध अध्यक्ष**

राज्यात ३०६ कृषी उत्पन्न बाजार समित्या कार्यरत आहेत. राष्ट्रीय कृषी उत्पन्न बाजार समिती जाहीर करण्यापूर्वी काही अटी निश्चित केल्याचे सांगण्यात आले. त्यामध्ये संबंधित बाजार समित्यांमध्ये वार्षिक शेतमालाची आवक किती मेट्रिक टन होते, हासुद्धा एक महत्त्वाचा निकष आहे. तसेच, संबंधित बाजार समितीमध्ये वार्षिक एकूण शेतमाल आवकेच्या ३० टक्के शेतमाल हा कमीत कमी दोन राज्यांमधून येत असला पाहिजे, अशा बाजार समित्यांना पहिल्या टप्प्यात राष्ट्रीय बाजार घोषित करण्याची शक्यता अधिक आहे. तसेच, त्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पणनमंत्री जयकुमार रावल हेसुद्धा आग्रही असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. त्यामुळे लवकरच कॅबिनेटच्या बैठकीत त्यावर शिक्कामोर्तब होण्याची दाट शक्यता आहे.

### ...तर राष्ट्रीय बाजारावर २१ संचालक राहणार

बाजार समित्यांचे अध्यक्षपद भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्याकडे देण्यावर सुरुवातीस चर्चा होती. मात्र, आता घोषित होणाऱ्या संभाव्य बाजार समित्यांचे पदसिद्ध अध्यक्षपद पणनमंत्रीच ठेवण्यावर एकमत झाल्याचे समजते. तसेच संचालक मंडळामध्ये शेतकरी व अडते-व्यापारी यांचे प्रतिनिधीही राहतील. तसेच केंद्र व राज्य सरकारमधील विविध विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश राहील. एकूणच, राष्ट्रीय बाजारावर शासननियुक्त संचालकांचा भरणाच प्राधान्याने केला जाईल.

### घोषणा होताच तत्काळ संचालक मंडळ होणार बरखास्त

मंत्रिमंडळात संबंधित बाजार समित्यांचा समावेश राष्ट्रीय बाजारात झाल्यास संबंधित कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे संचालक मंडळ तत्काळ बरखास्त होणार असल्याचेही सांगण्यात आले. शिवाय बाजार समित्यांवरील सचिव हा सहकार विभागातील अपर निबंधकांऐवजी किमान सहनिबंधक दर्जाचा ठेवण्यावरही एकमत झाले आहे. त्यापेक्षा कमी दर्जाचा कोणताही अधिकारी राजकीय वरदहस्त ठेवून वशिल्याने बसविला जाणार नाही आणि असल्यास त्यांचीही गच्छंती अटळ असल्याचेही मंत्रालयातील सूत्रांकडून स्पष्ट करण्यात

Sakal, 28/07/2025

# बाजार समित्यांना निधी देणार : अजित पवार

राहुरी (जि. अहिल्यानगर), ता. २७ : राज्यातील सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे आधुनिकीकरण व बळकटीकरण करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान, यंत्रणा उपलब्ध करून देण्याचे शासनाचे धोरण आहे. यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यास कटिबद्ध आहे, अशी ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

राहुरी येथे रविवारी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात शेतकरी भवन व उपहारगृह इमारतीच्या लोकार्पणप्रसंगी शेतकरी व कार्यकर्ता मेळाव्यात उपमुख्यमंत्री पवार बोलत होते.



पवार म्हणाले, की कृषी उत्पन्न बाजार समित्या या शेतकरी व समाजाच्या मालकीच्या संस्था असून, त्या नफ्यात व काटकसरीने कशा चालतील, याचा विचार आवश्यक आहे. शासनाने कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर शेतीमध्ये वाढवण्यासाठी ५०० कोटींची तरतूद केली आहे. कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उसाचे उत्पादन वाढविण्याचा विचार शेतकऱ्यांनी करावा. शेतीमध्ये फळबाग लागवड, तीन पिकांनंतर ऊसाच्या बियाण्यात बदल, आणि शाश्वत पद्धतीचा अवलंब करणे गरजेचे आहे.

Agrowon, 28/07/2025

# हमीभाव समितीच्या तीन वर्षांत सहा बैठका

अॅग्रोवन वृत्तसेवा

पुणे : केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्या पिकांना किमान आधारभूत किंमत (हमीभाव) देण्यासाठी स्थापन केलेल्या समितीने आतापर्यंत सहा बैठका घेतल्या आहेत, अशी माहिती केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी नुकतीच संसदेत दिली.

केंद्रीय कृषी मूल्य आणि किंमत आयोगाने निश्चित केलेल्या दरानुसार शेतकऱ्यांना हमीभाव मिळावा, यासाठी कायदा आणणार आहात का? हा तारांकित प्रश्न वायआरएस काँग्रेसचे खासदार पी. व्ही. मिधून रेड्डी यांनी उपस्थित केला.

त्यावर कृषिमंत्री चौहान यांनी स्पष्ट उत्तर देणे टाळले. केंद्र सरकारने स्थापन केलेल्या हमीभाव समितीच्या बैठका नियमितपणे आयोजित केल्या जात आहेत, असे स्पष्ट करून ते म्हणाले, ''हमीभाव प्रभावी व पारदर्शक करण्यासाठी १२ जुलै २०२२ रोजी एक समिती स्थापन करण्यात आली.

कृषी मूल्य आणि किंमत आयोगाला अधिक स्वायत्तता देण्यासह त्याचे कार्य अधिक शास्त्रीय करण्यासाठीच्या उपाययोजना आणि देशाच्या बदलत्या गरजेनुसार कृषी पणन यंत्रणा मजबूत करण्यासंबंधी सूचना देणे याचा या समितीच्या कार्यक्षेत्रामध्ये समावेश आहे. आतापर्यंत समितीच्या सहा मुख्य बैठका झाल्या आहेत. याशिवाय विविध उपसमित्यांच्या ३९ बैठकाही पार पडल्या आहेत.''

तसेच केंद्र सरकार दरवर्षी २२ पिकांसाठी हमीभाव निश्चित करत असून ही किंमत आयोगाच्या शिफारशींवर आधारित असते. या शिफारशी राज्य सरकारे तसेच संबंधित केंद्रीय मंत्रालये आणि विभाग यांचे अभिप्राय घेऊन निश्चित केल्या जातात, असेही कृषिमंत्री म्हणाले.

तारांकित प्रश्नाच्या उत्तरात कृषिमंत्र्यांनी शेतीमालाच्या निर्यातीवर भाष्य केले. ''देशांतर्गत आणि निर्यात संधींचा लाभ घेऊन शेतकऱ्यांच्या शेतीमालाला अधिकचा भाव मिळवून देण्याचे केंद्र सरकारचे उद्दिष्ट आहे,'' असे ते म्हणाले.

## पंजाबच्या शेतकरी नेत्यांशी बैठक

पंजाबमधील चंडीगडमध्ये शेतकरी संघटनांसोबत झालेल्या चर्चेतील ठळक निष्कर्षांची माहिती सदस्यांनी मागितली होती. त्यावर उत्तर देताना कृषिमंत्री चौहान यांनी बैठकांचा तपशील दिला. चंडीगडमध्ये या वर्षी शेतकरी संघटनांसोबत तीन बैठकांचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत शेती व शेतकरी कल्याणाशी संबंधित विविध विषयांवर चर्चा झाल्याचे त्यांनी सांगितले.

महाअ‍ॅग्रो

Agrowon, 26/07/2025

# 'मॅग्नेट'च्या २१०० कोटींच्या मान्यतेसाठी केंद्राला प्रस्ताव

## दुसऱ्या टप्प्यात द्राक्षे, पपई, हळद, अंजीर, शेवगा, टोमॅटो, आले, फणसाचा समावेश

अ‍ॅग्रोवन वृत्तसेवा

मुंबई : आशियायी विकास बँक अर्थसह्यित महाराष्ट्र अ‍ॅग्रीबिझनेस नेटवर्क अर्थात मॅग्नेट प्रकल्पाच्या २१०० कोटी रुपयांचा दुसरा टप्पा राबविण्यास राज्य सरकारने मान्यता दिली आहे. त्यानुसार केंद्र सरकारच्या वित्त विभागाकडे मान्यतेसाठी प्राथमिक प्रकल्प अहवाल पाठविण्यात आला आहे.

प्रकल्पांतर्गत समाविष्ट १५ फलोत्पादन पिकांव्यतिरिक्त मॅग्नेट प्रकल्पाचा पुढील विस्तारित टप्पा म्हणून द्राक्षे, पपई, हळद, अंजीर, शेवगा, टोमॅटो, आले व फणस या आठ नवीन पिकांचा समावेश करण्यात आला आहे.

मॅग्नेटचा पहिला टप्पा सहा वर्षांसाठी २०२० पासून राबविण्यात येत असून एक हजार कोटींपैकी ७०० कोटी रुपये आशियायी विकास बँकेकडून कर्ज स्वरूपात तर ३०० कोटी रुपये राज्य शासनाच्या स्वनिधीतून देण्यात येणार आहेत.

### फळ निर्यातीवर लक्ष

'मॅग्नेट २'अंतर्गत राज्यातील कृषी व्यवसाय प्रणाली अधिक बळकट करण्यासाठी पायाभूत सुविधा सुधारणा, वित्तीय व संस्थात्मक सहाय्याचा विस्तार आणि महाराष्ट्राच्या फलोत्पादन पीक निर्यातीला चालना देण्यावर लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे.

पहिल्या टप्प्यात डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी, सीताफळ, पेरु, चिकू, स्ट्रोबेरी, भेंडी व मिरची (हिरवी व लाल) या १० फलोत्पादन व काही फुलपिकांचा समावेश आहे. या पिकांच्या मूल्यसाखळ्यांमध्ये खासगी गुंतवणुकीला आकर्षित करून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे, फळे व भाजीपालांचे काढणीपश्चात नुकसान कमी करणे, त्यांची साठवणूक क्षमता वाढविणे, मालाची मूल्यवृद्धी करणे असे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. या प्रकल्पात आंबा, काजू, लिंबू व पडवळ या आणखी चार पिकांचा समावेश करण्यात आला होता. त्यामुळे फळ-फुलपिकांची संख्या १५ झाली आहे.

हा प्रकल्प आता अंतिम टप्प्यात असून दुसरा टप्पा राबविण्याबाबत गुरुवारी (ता. १७) बैठक घेण्यात आली. तसेच याबबात पावसाळी अधिवेशनात पणनमंत्री जयकुमार रावल यांनी घोषणा केली होती.

पहिल्या प्रकल्पात समाविष्ट १५ फलोत्पादन पिकांव्यतिरिक्त विस्तारित टप्प्यात द्राक्षे, पपई, हळद, अंजीर, शेवगा, टोमॅटो, आले व फणस या आठ नवीन पिकांचा समावेश असलेला २१०० कोटी म्हणजे २५० दशलक्ष डॉलर रकमेचा हा प्रकल्प २०२५ ते २०३१ या काळात राबविण्यात येणार आहे. त्यासाठी मान्यता देण्याची तसेच, मॅग्नेट २ प्रकल्पांचा प्राथमिक प्रकल्प अहवाल केंद्रीय अर्थ विभागाच्या आर्थिक व्यवहार विभागाला सादर केला आहे.


# कृषी सुविधांना 'मॅग्नेट'ची बळकटी

## २१०० कोटी रुपयांच्या प्रकल्पाला मान्यता

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** कृषी पायाभूत सुविधा अधिक बळकट करणाऱ्या (महाराष्ट्र अॅग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प २.०' ला राज्य सरकारने मान्यता दिली आहे. आशियाई विकास बँकेच्या मदतीने २१०० कोटी रुपये खर्चून २०२५ - २०३१ या काळात योजनेची अंमलबजावणी होणार आहे.

राज्य सरकारने सप्टेंबर २०२० मध्ये पहिल्यांदा सहा वर्षांसाठी मॅग्नेट प्रकल्प राबविण्यास मान्यता दिली होती. पहिल्या टप्प्यातील प्रकल्प हजार कोटी रुपयांचा होता. त्यासाठी आशियाई विकास बँकेने ७० टक्के म्हणजे ७०० कोटी आणि ३०० कोटी रुपये राज्य सरकारने खर्च केले होते. पहिल्या टप्प्यात डाळींब, केळी, संत्रा, मोसंबी, सीताफळ, पेरू यासह काही फुलपिकांचा समावेश होता.



### या बाबींना चालना...

प्रामुख्याने राज्यातील कृषी व्यवसाय प्रणाली अधिक बळकट करण्यासाठी पायाभूत सुविधा वाढविणे, काढणी पश्चात नुकसान कमी करणे, साठवणूक क्षमता वाढविण्यासाठी गोदामे, शीतगृहांची उभारणी करणे, वित्तीय व संस्थात्मक पातळीवर मदत करून निर्यातीला चालना दिली जाणार आहे.

मॅग्नेट २.० प्रकल्पात कृषी क्षेत्रातील पायाभूत सुविधा अधिक मजबूत करून कृषी निर्यात वृद्धीवर लक्ष्य केंद्रित केले जाईल. द्राक्षे, डाळींबासह अन्य फळे, फुले आणि भाजीपाला निर्यातीच्या संधी शेतकऱ्यांना, शेतकरी उत्पादक कंपन्यांनी उपलब्ध करून देण्यात येतील.
– माणिकराव कोकाटे, कृषिमंत्री

### गडचिरोलीत कृषिभवन उभारण्यास मंजुरी

**मुंबई :** गडचिरोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कृषीविषयक सेवा एका छताखाली मिळाव्यात आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावा, या व्यापक हेतूने गडचिरोलीत नवे कृषिभवन इमारत बांधकामास मान्यता दिल्याची माहिती कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिली.

या प्रकल्पासाठी ११.६७ कोटींची प्रशासकीय मान्यता दिली असून, हे भवन सोनापूर येथील फळरोप वाटिकेच्या जागेत उभारले जाणार आहे. यामुळे आधुनिक सेवा एकाच छताखाली मिळतील. कृषी विभागाची जिल्हा व तालुक्यामधील सर्व कार्यालये एकाच ठिकाणी सुसज्ज इमारतीमध्ये येतील.

Agrowon, 17/07/2025

# 'रुंजीस'च्या धर्तीवर महामुंबई आंतरराष्ट्रीय बाजार

## लवकरच ग्लोबल टेंडर; दोन हजार एकर जागेची पालघर जिल्ह्यात चाचपणी

गणेश कोरे : ॲग्रोवन वृत्तसेवा

**पुणे :** फ्रान्समधील पॅरिसजवळील रुंजीस आंतरराष्ट्रीय बाजाराच्या धर्तीवर महामुंबई आंतरराष्ट्रीय बाजार साकारण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी पालघर जिल्ह्यात दोन हजार एकर जागेची चाचपणी करण्यात येत आहे. जागा उपलब्ध झाल्यानंतर ग्लोबल टेंडर काढण्यात येणार आहे. या प्रकल्पाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्त्वतः मान्यता दिली आहे, **पान ४ वर »**



पॅरिस जवळील रुंजीस येथील आंतरराष्ट्रीय बाजार

### प्रस्तावित महामुंबई आंतरराष्ट्रीय बाजार

- बी टू बी बाजार.
- आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील मागणीनुसार बाजारात फळे, भाजीपाला, मांस, मासे यांची आवक.
- मार्केट इंटेलिजन्सचा वापर होणार.
- हंगामनिहाय शेतकऱ्यांना पीकपद्धतीचा सल्ला.
- थेट शेतावरून कंटेनर पॅक होऊन बाजारात येणार. त्यामुळे काढणीपश्चात नुकसान ३० टक्क्यांवरून ३ टक्क्यांपर्यंत येणे शक्य.
- आंतरराष्ट्रीय कंपनी बाजार संचलन करणार.
- कंपनी लॉजिस्टिक आणि शीतसाखळी सेवा देणार.
- शेतकऱ्यांच्या बाजारात येण्याची गरज भासणार नाही.
- थेट बांधावरच खरेदी-विक्री होणार.
- बाजारपेठेच्या गरजेनुसार करार शेतीसाठी शेतकऱ्यांना कंपनी देणार भागभांडवल.

# 'रुंजीस'च्या धर्तीवर महामुंबई आंतरराष्ट्रीय बाजार

**» पान १ वरून**

अशी माहिती सूत्रांनी दिली.

मुंबईमध्ये आंतरराष्ट्रीय बाजार उभारण्यासाठी पणनमंत्री जयकुमार रावल यांनी पणन विभागाच्या अधिकाऱ्यांसह फ्रान्सचा दौरा केला होता. या वेळी त्यांनी रुंजीस आंतरराष्ट्रीय बाजाराला भेट देऊन बाजाराचे संचलन कसे होते याची माहिती घेतली होती. रुंजीस बाजार पॅरिस शहराच्या जवळ आहे. पूर्वी पॅरिस शहरामध्ये २५ एकरांवर मध्यवर्ती बाजार होता. जागी कमी पडू लागल्याने १९६९ मध्ये तो रुंजीस येथे येथे स्थलांतरित करण्यात आला. तिथे सुमारे ५७० एकर क्षेत्रावर आंतरराष्ट्रीय बाजार विकसित करण्यात आला. रुंजीस पेक्षाही मोठा बाजार मुंबईत साकारण्याचा राज्य सरकारचा मानस आहे. रुंजीस बाजार हा राष्ट्रीय महामार्ग, विमानतळ, बंदरे, रेल्वेमार्ग यांच्या लगत आहे. याच धर्तीवर वाढवण बंदर, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, समृद्धी महामार्गालगत महामुंबई आंतरराष्ट्रीय बाजार वसविण्याचे प्रस्तावित आहे.

महामुंबई आंतरराष्ट्रीय बाजाराबाबतचे सादरीकरण सोमवारी (ता.१४) मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह उच्चाधिकार समितीसमोर करण्यात आले. या वेळी मुख्यमंत्री कार्यालयाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे, मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव श्रीकर परदेशी, सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, कृषी विभागाचे प्रधान सचिव विकास चंद्र रस्तोगी, 'पदुम'चे सचिव डॉ. रामास्वामी एन, पणनचे सहसचिव विजय लहाने, पालघरच्या जिल्हाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक कौस्तुभ दिवेगावकर, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, पणन संचालक विकास रसाळ आदी अधिकारी उपस्थित होते.

महामुंबई आंतरराष्ट्रीय कृषी बाजारपेठ प्रकल्पात विविध आंतरराष्ट्रीय कंपन्यांनी सहभागाची तयारी दर्शवल्याचे सूत्रांनी सांगितले.

Sakal, 16/07/2025

# एक जिल्हा-एक उत्पादनात नाशिक उत्कृष्ट

## केंद्राकडून सन्मान; महाराष्ट्राला सुवर्ण

**नवी दिल्ली- नाशिक, ता. १५ :** केंद्र सरकारच्या 'एक जिल्हा, एक उत्पादन-२०२४' (ओडीओपी) उपक्रमांतर्गत महाराष्ट्राने 'अ'-श्रेणीमध्ये सुवर्णपदक पटकावले असून द्राक्ष व मनुक्यांसाठी नाशिक जिल्ह्याला विशेष उल्लेखनीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी सोमवारी (ता. १४) नवी दिल्ली येथील भारत मंडपममध्ये हा पुरस्कार स्वीकारला.

राष्ट्रीयस्तरावरील या पुरस्कार वितरण समारंभाला केंद्रीय वाणिज्य व उद्योगमंत्री पीयूष गोयल, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता आणि वाणिज्य व उद्योग राज्यमंत्री जितिन प्रसाद आदी उपस्थित होते. राज्यातर्फे उद्योग संचालनालयाचे विकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह यांनी हा मान स्वीकारला आहे.

राष्ट्रीयस्तरावर वर्चस्व

महाराष्ट्राने उत्पादनांची नाविन्यपूर्णता, उच्च दर्जा आणि वैशिष्ट्यपूर्ण गुणवत्तेच्या जोरावर राष्ट्रीयस्तरावर आपले वर्चस्व



प्रस्थापित केले आहे. 'एक जिल्हा, एक उत्पादन' या उपक्रमांतर्गत प्रत्येक जिल्ह्याच्या वैशिष्ट्यपूर्ण उत्पादनांना प्रोत्साहन दिले जात असल्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळत आहे. जागतिक बाजारपेठेतही या उत्पादनांचा ठसा उमटविण्याचा प्रयत्न होत आहे.

तीन गटांमध्ये विभागणी

या पुरस्कारांमध्ये जिल्हा, राज्य आणि परदेशातील भारतीय दूतावास अशा तीन गटांत विभागणी करून सन्मान प्रदान करण्यात आले. नाशिकच्या द्राक्षांनी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्थान अधिक भक्कम केले असून, यामुळे जिल्ह्याच्या कृषी क्षेत्रातील योगदानाला राष्ट्रीय पातळीवर मान्यता मिळाली आहे.

### राज्याला मिळालेले पुरस्कार

| | | |
|---|---|---|
| नाशिक | द्राक्षे व मनुका | कृषी क्षेत्रातील अ-श्रेणी विशेष उल्लेख पुरस्कार |
| रत्नागिरी | हापूस आंबा | सुवर्णपदक |
| नागपूर | संत्रा | रौप्यपदक |
| अमरावती | मंदारिन संत्रा | ब्रांझपदक |
| अकोला | कापूस जिनिंग व प्रेसिंग | गैर-कृषी क्षेत्रात विशेष उल्लेख पुरस्कार |

Lokmat, 16/07/2025

# बाजार समित्यांना राष्ट्रीय कक्षेत आणण्यासाठी सुधारणा करा : फडणवीस

लोकमत न्यूज नेटवर्क



**पुणे :** राज्यातील बाजार समित्यांना राष्ट्रीयीकरणाच्या कक्षेत आणण्यासाठी सुधारणा २०१८ विधेयक क्र.६४ प्रस्तावित करण्याची सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी विधानभवनात बैठकीत केली. त्यामुळे या विधेयकाचा अध्यादेश आधी काढला जाणार आहे.

येणाऱ्या अधिवेशनात हे विधेयक मांडले जाणार असल्याची माहिती. विश्वसनीय सूत्रांनी दिली. काही बाजार समित्यांना राष्ट्रीय दर्जा प्राप्त होणार आंहे. बाजार समित्या आणि शेतकऱ्यांना याचा मोठा लाभ होईल. त्यामुळे पणन सुधारणा कायदा गरजेचा असल्याची माहिती रावल यांनी मुख्यमंत्र्यांना दिली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी कायदा गरजेचा असून, तो लवकर प्रस्तावित करा, अशी सूचना केली.

आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय बाजाराबाबत झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पणन मंत्री जयकुमार रावल, सहकार पणन विभागाचे प्रधान सचिव, राज्याचे पणन संचालक विकास रसाळ यांच्यासह अधिकारी वर्ग उपस्थित होता.

रावल म्हणाले, केंद्राच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी आणि राज्यातील शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने केंद्र शासनाचा नवीन कायदा राज्यात करणे गरजेचे आहे. पणनमंत्री जयकुमार रावल यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेली उपसमिती कोणत्या सुधारणा सुचविते याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

## राष्ट्रीय दर्जासाठी हालचालींना वेग

पहिल्या टप्प्यात राज्यातील मुंबई, पुणे, नाशिक आणि नागपूर या चार बाजार समित्यांना राष्ट्रीय दर्जा देण्याच्या हालचालींना आता वेग आला आहे. केंद्र शासनाच्या नवीन मॉडिलनुसार विविध पणन सुधारणा राज्य शासनाने केल्या आहेत.

## प्रस्तावित सुधारणांची मुख्य वैशिष्ट्ये

**विविध** प्रकारचे बाजार स्थापन करण्याबाबत तरतुदी.

**बाजार** उपतळ म्हणून वखार, सायलो, शीतगृह, इत्यादींकरिता तरतुदी.

**ई-नाम, ई-** व्यापारासाठीच्या तरतुदी

**पशुधनाच्या** संबंधातील पणनाचे विनियमन करण्याकरिता तरतुदी.

**राष्ट्रीय** नामांकित बाजारतळ व त्याच्याशी संबंधित आणि अनुषंगिक बाबींकरिता तरतुदी.

Pudhari, 15/07/2025

# शेतीला मिळणार 'एआय'चे बळ

## नव्या कृषी धोरणाने बळीराजा होणार हायटेक

रायगड : जयंत धुळप

**राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या शेतीला आता आर्टिफिशिअल इंटेलिजन्स (एआय) आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळणार आहे. बदलते हवामान, बाजारपेठेतील अनिश्चितता आणि पारंपरिक अडचणींवर मात करण्यासाठी राज्य सरकारने 'महाॲग्री-एआय धोरण २०२५-२९' जाहीर केले आहे. या क्रांतिकारी निर्णयामुळे राज्यातील दीड कोटींहून अधिक शेतकऱ्यांच्या हातात ड्रोन, एआय चॅटबॉट आणि सॅटेलाईटसारखी स्मार्ट शस्त्रे येणार असून शेतीला अधिक उत्पादनक्षम, पारदर्शक आणि जागतिक दर्जाचे बनवण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.**

राज्यातील निम्म्याहून अधिक लोकसंख्या थेट शेतीवर अवलंबून आहे. त्यामुळे शेतीतील प्रत्येक चढउतार राज्याच्या आर्थिक आणि सामाजिक स्थैर्यावर परिणाम करतो. अन्नसुरक्षेसोबतच ग्रामीण भागाचे जीवनमान उंचावण्यासाठी शेतीत आमूलाग्र बदल घडवणे आवश्यक होते. हीच गरज ओळखून सरकारने हे तंत्रज्ञानआधारित धोरण आणले आहे.

**'महाॲग्री-एआय' धोरण : एका नजरेत**

ॲग्री डेटा एक्स्चेंज : महावेध, क्रॉपसॅप, ॲगमार्कनेट यांसारख्या सर्व सरकारी डेटाबेसला एकत्र जोडून एक शक्तिशाली 'क्लाऊड आधारित' प्रणाली तयार केली जाईल. यामुळे हवामान, पीक आरोग्य आणि बाजारभावाची अचूक माहिती एकाच ठिकाणी मिळेल.

इनोव्हेशन हब : आयआयटी आणि आयआयएससी यांसारख्या संस्थांच्या मदतीने राज्यातील चारही कृषी विद्यापीठांमध्ये 'एआय इन्क्यूबेशन केंद्रे' उभारली जातील. ही केंद्रे स्टार्टअप्स आणि संशोधकांना प्रोत्साहन देतील.



### धोरणाचे केंद्रबिंदू

- **एकूण निधी :** 500 कोटी (5 वर्षांसाठी)
- **लाभार्थी :** राज्यातील 1.53 कोटी शेतकरी
- **तंत्रज्ञान :** एआय, ड्रोन, ब्लॉकचेन, रिमोट सेन्सिंग
- **उद्दिष्ट :** स्मार्ट, शाश्वत आणि फायदेशीर शेती

### शेतकऱ्यांच्या हातात स्मार्ट 'हत्यारे'



- **महाविस्तार ॲप :** हे शेतकऱ्यांसाठी 'वन स्टॉप शॉप' असेल. माती परीक्षण, कीड नियंत्रण, हवामान अंदाज, बाजारभाव आणि सरकारी योजनांची सर्व माहिती व्हिडीओंसह एका क्लिकवर मिळेल.
- **डिजिटल मैत्री चॅटबॉट :** शेतकऱ्यांच्या कोणत्याही प्रश्नाला मराठीतून तत्काळ आणि अचूक उत्तरे देणारा हा एआय आधारित 'मित्र' असेल. आता कृषी सल्लागाराची वाट पाहण्याची गरज नाही.
- **ड्रोन आणि सॅटेलाइट :** पिकांवरील रोगांचे निदान, अचूक फवारणी आणि नुकसानीचे सर्वेक्षण आता ड्रोन आणि सॅटेलाईटद्वारे होईल. यामुळे वेळ, पैसा आणि श्रमाची मोठी बचत होईल.

पारदर्शक बियाणे बाजार : 'साथी' पोर्टलच्या माध्यमातून बोगस बियाणे आणि खतांना पूर्णपणे आळा बसेल. पुढील वर्षापासून १०० टक्के बियाण्यांची नोंदणी यावर अनिवार्य असेल.

**अचूक नुकसानभरपाई, वेळेवर मदत**

पिकांच्या नुकसानीनंतर पंचनामे आणि भरपाईसाठी होणारा विलंब हा शेतकऱ्यांसाठी सर्वात मोठा चिंतेचा विषय असतो. यावर एआय आधारित 'रिमोट सेन्सिंग' प्रणाली रामबाण उपाय ठरणार आहे.

सॅटेलाईट आणि ड्रोनद्वारे मिळवलेल्या अचूक डेटाच्या आधारे नुकसानीचे मूल्यांकन केले जाईल. यामुळे मानवी हस्तक्षेपाशिवाय, जलद आणि पारदर्शकपणे पीक विम्याचे दावे निकाली निघतील आणि शेतकऱ्यांच्या खात्यात वेळेवर मदत पोहोचेल.

**भविष्याचा वेध**

'महाॲग्री एआय धोरण' हे केवळ तंत्रज्ञान वापरण्यापुरते मर्यादित नाही, तर ते महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्राला एका नव्या उंचीवर नेण्याची क्षमता ठेवते. ब्लॉकचेन तंत्रज्ञानामुळे शेतमालाला जागतिक बाजारपेठेत विश्वासार्हता मिळेल, तर प्रिडिक्टिव्ह ॲनालिटिक्समुळे भविष्यातील संकटांची चाहूल आधीच लागेल. या धोरणाच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे महाराष्ट्राचा शेतकरी केवळ 'अन्नदाता' न राहता, एक 'स्मार्ट उद्योजक' म्हणून उभा राहील, यात शंका नाही.

Kesari, 15/07/2025

# राष्ट्रीय बाजार समितीचे विधेयक पुढील अधिवेशनात

## आधी वटहुकूम नंतर विधेयक मांडणार; फडणवीस यांची माहिती

**पुणे :** राज्यातील बाजार समित्यांना राष्ट्रीयकरणाच्या कक्षेत आणण्यासाठी सुधारणा २०१८ विधेयक क्र. ६४ प्रस्तावित करण्याची सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी विधानभवनात झालेल्या बैठकीत केली. या विधेयकाचा वटहुकूम आधी काढला जाणार आहे. त्यांनंतर येणाऱ्या अधिवेशनात हे विधेयक मांडले जाणार असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली.

आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय बाजाराबाबत झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस, पणन मंत्री जयकुमार रावल, सहकार पणन विभागाचे प्रधान सचिव, राज्याचे पणन संचालक विकास रसाळ यांच्यासह अधिकारी वर्ग उपस्थित होते.

बाजार समित्यांना राष्ट्रीय बाजाराचा दर्जा देण्यासंदर्भातल्या चर्चेवेळी रावल म्हणाले, केंद्राच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी आणि राज्यातील शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने केंद्र शासनाचा नवीन कायदा राज्यात करणे गरजेचे आहे. यामुळे बाजार समित्या आणि शेतकऱ्यांना याचा मोठा लाभ होईल. त्यामुळे पणन सुधारणा कायदा गरजेचे असल्याची माहिती रावल यांनी मुख्यमंत्र्यांना दिली. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी कायदा गरजेचा असून तो लवकर प्रस्तावित करा अशी सूचना केली.

### विद्यमान संचालक मंडळे होणार बरखास्त?

सुधारणा २०१८ विधेयकामुळे एकूण आवकेच्या ३० टक्के शेतमाल किंवा ३ पेक्षा अधिक राज्यांतून येत असलेल्या बाजार समित्यांना राष्ट्रीय दर्जा देण्यात येणार आहे. बाजार समित्यांवरील विद्यमान संचालक मंडळे बरखास्त होऊन प्रशासकीय मंडळ नियुक्त करणे, विशेष शेतीमालाची बाजार समित्यांची घोषणा करणे यासह अनेक सुधारणा सुचवल्या आहेत. विधेयक क्रमांक ६४ मुळे राष्ट्रीयीकरणाच्या कक्षेत पुणे बाजार समितीचा कारभार येणार आहे.

पहिल्या टप्प्यात राज्यातील मुंबई, पुणे, नाशिक आणि नागपूर या चार बाजार समित्यांना राष्ट्रीय दर्जा देण्यात येणार असल्याची माहिती आहे. केंद्र सरकारच्या नवीन मॉडेलनुसार विविध पणन सुधारणा राज्य सरकारने केल्या आहेत. यामधील सर्वांत महत्त्वपूर्ण सुधारणांमध्ये ग्रामीण महाराष्ट्रातील सर्वांत मोठी आर्थिक सत्ता केंद्र असलेल्या मोठ्या बाजार समित्या स्वतःच्या ताब्यात घेण्याची राजकीय खेळी सरकारने २०१८ मध्येच केली होती. बाजार समित्यांवर सनदी अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखालील सरकार नियुक्त प्रशासकीय मंडळाची नियुक्तीची शक्यता आहे. समित्यांवर आता सरकार नियुक्त २३ जणांच्या प्रशासकीय मंडळाची नियुक्तीची शिफारस जुन्या विधेयकात होती.

सरकार नियुक्त प्रशासकीय मंडळात सभापती पणन मंत्री अथवा राज्य सरकारला योग्य वाटेल अशी कोणतीही व्यक्ती. सचिवपदी सहनिबंधक दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला प्रतिनिधी. उपसभापती- अपर निबंधक (सहकार) पदापेक्षा कमी दर्जाची नसेल असे अधिकारी. महसूल विभागातील एक या प्रमाणे ६ शेतकरी प्रतिनिधी. दोन राज्यांतील सरकारने शिफारस केलेले २ शेतकरी प्रतिनिधी. संबंधित बाजार समितीमधील पाच परवानाधारक व्यापारी. केंद्रीय किंवा राज्य वखार महामंडळासह, अधिकृत वखार चालकांचे प्रतिनिधी. यासह विविध विभागातील प्रतिनिधी असणार आहेत.

Agrowon, 15/07/2025

# राष्ट्रीय बाजारासाठी मुख्यमंत्री सकारात्मक

## महामुंबई आंतरराष्ट्रीय बाजारासाठी दोन हजार एकर जागेच्या चाचपणीची सूचना

गणेश कोरे : ॲग्रोवन वृत्तसेवा

**पुणे : राज्यात पुण्यासह पाच बाजारसमित्यांना राष्ट्रीय दर्जा देण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सकारात्मक आहेत. तसेच महामुंबई आंतरराष्ट्रीय बाजारासाठी दाबचेरी (जि. पालघर) येथे दोन हजार एकर जागेची चाचपणी करा, अशा सुचनाही त्यांनी पणन विभागाला दिल्या आहेत, अशी माहिती सूत्रांनी दिली.**



मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी (ता. १४) झालेल्या बैठकीत पणनमंत्री जयकुमार रावल यांनी राज्यातील प्रस्तावित पणन सुधारणांविषयीचे सविस्तर सादरीकरण केले. या वेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे, सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाचे सचिव, राज्याचे पणन संचालक विकास रसाळ, पणन मंडळाचे कार्यकारी संचालक डॉ. संजय कदम यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राज्यातील पुणे, नाशिक, सोलापूर, लातूर, नागपूर बाजार समित्यांना राष्ट्रीय बाजाराचा तर मुंबई बाजार समितीला आंतरराष्ट्रीय बाजाराचा दर्जा देण्याच्या हालचाली सुरू आहेत. त्याच अनुषंगाने झालेल्या या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी यासंदर्भातील प्रस्ताव आणि बाजार समित्यांच्या सक्षमीकरणाचे प्रस्ताव तातडीने सादर करा, त्यावर कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन दिले.

पान ४ वर »

### कारभार प्रशासकीय मंडळाकडे?

दरम्यान, पणन सुधारणांच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्रातील आर्थिक सत्ताकारणाचे केंद्र असलेल्या मोठ्या बाजार समित्या ताब्यात घेण्याचे प्रयत्न सरकारने सुरू केले आहेत. त्यानुसार बाजार समित्यांचा कारभार निवडून आलेल्या संचालक मंडळाऐवजी सनदी अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखालील प्रशासकीय मंडळाकडे सोपविला जाण्याची शक्यता आहे.

## राष्ट्रीय बाजारासाठी मुख्यमंत्री सकारात्मक

» पान १ वरून

केंद्र शासनाने २०१७ मध्ये मॉडेल ॲक्टचा मसुदा सर्व राज्यांना दिला. त्यामध्ये 'एक देश एक बाजार' या संकल्पनेवर विविध सुधारणा सुचविल्या होत्या. मात्र त्या अद्याप अंमलात आलेल्या नाहीत. केंद्र सरकारच्या सूचनेनुसार पणन व्यवस्थेमध्ये आमूलाग्र बदलांसाठी १०० दिवसांच्या कृती कार्यक्रमातदेखील मुंबईला आंतरराष्ट्रीय बाजार उभारण्याचे जाहीर करण्यात आले होते. त्यानुसार महामुंबई आंतरराष्ट्रीय बाजारासाठी दोन हजार एकर जागेच्या उपलब्धतेची चाचपणी करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या असल्याचे सूत्रांनी सांगितले.

Agrowon, 11/07/2025

# अकोल्यातून २० टन केळी इराणला रवाना

अकोला : स्थानिक बाजारात दर्जेदार केळीला भाव मिळत नसल्याने संघर्ष करीत असलेल्या शेतकऱ्यांनी आता निर्यातदारांच्या माध्यमातून आपला माल विदेशात पाठवणे सुरू केले आहे. मंगळवारी (ता. ८) तेल्हारा तालुक्यातील हिंगणी येथील शेतकऱ्याची २० टन वजनाची गाडी निर्यातदाराने इराणसाठी रवाना केली.

अकोला जिल्ह्यात दर्जेदार केळी पिकवूनही स्थानिक व्यापारी दर पाडून खरेदी करतात. गेल्या आठवड्यात केळी उत्पादकांनी बोर्डाच्या दरांसाठी संबंधितांसमवेत चर्चाही घडवून आणली. आता त्यापुढे पाऊल टाकत एका निर्यातदार कंपनीच्या माध्यमातून आपल्या केळीची विदेशात विक्री सुरू केली.

मंगळवारी (ता. ८) पहिल्या गाडीची रवानगी झाली यानिमित्ताने केळी उत्पादकांसाठी मार्गदर्शन कार्यक्रम झाला. या वेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शंकर किरवे, तालुका कृषी अधिकारी श्री. बुरांडे, मंडळ कृषी अधिकारी गौरव राऊत, केळी उत्पादक शेतकरी संघाचे राज्य समन्वयक सचिन कोरडे, जिल्हाध्यक्ष अनंता पाटील इंगळे, जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष रौंदळे, केळी निर्यात करणाऱ्या कंपनीचे प्रतिनिधी अजिंक्य ताकीक, रोहित मोहिते, सागर जाधव, दीपक मांगुले व हनुमंत खबाले उपस्थित होते.

यावेळी श्री. किरवे व सचिन कोरडे यांनी शेतकऱ्यांना केळीचा दर्जा, पॅकिंग, निर्यात प्रक्रियेसंदर्भात मार्गदर्शन केले. शेतकरी शंकर अनंतराव कोरडे यांनी उत्पादित केलेल्या केळीची इराण देशात यशस्वी निर्यात होत असल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला परिसरातील शेतकरी गणेश कोरडे, दीपक कोरडे, सुधाकर कोरडे, पप्पू नराजे, रामा जोध, सचिन जोध, गोटू कोरडे, यश नराजे, रमेश नराजे, दीपक जोध, मंगेश कोरडे, वैभव कोरडे, उमेश कोरडे, गोपाल राऊत, अंकुश दांदळे, वैभव लाहोळे, शैलेश विखे, स्वप्नील महल्ले यांची उपस्थिती होती.



अकोला : हिंगणी (ता. तेल्हारा) येथील केळीची इराणला निर्यात सुरू झाल्याने, यानिमित्त आयोजित कार्यक्रमात जिल्हा अधीक्षक शंकर किरवे, सचिन कोरडे, अनंता पाटील, सुभाष रौंदळे, गौरव राऊत यांच्या उपस्थितीत उत्पादक शेतकऱ्याचा सत्कार करण्यात आला.

## दर्जानुसार १८०० रुपयांपर्यंत दर मिळण्याचा विश्वास

संबंधित निर्यातदारांनी मंगळवारी (ता. ८) पहिली गाडी भरली. आता दररोज या भागातून केळीच्या किमान दोन गाड्या इराणला पाठवण्याच्या उद्देशाने भरल्या जाणार आहेत. स्थानिक भागातील केळी निर्यात होऊ लागल्याने दर्जानुसार कमाल १८०० रुपयांपर्यंत दर मिळतील, असा विश्वास श्री. कोरडे यांनी व्यक्त केला.